(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

नक्षल प्रभावित भागातील वनजमीन वळतीकरणाचे प्रस्ताव मंजूरीसंदर्भात समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: एफएलडी-२०१८/प्र.क्र.१४३/फ-१०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: १५.०५.२०१८

वाचा :-

१. पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ११-९/९८-एफसी, दि.१३.०५.२०११, दि. १६.०६.२०११, दि.१०.१२.२०१२, दि.०१.०२.२०१३, दि.१७.०५.२०१३, दि.०५.०३.२०१४
२. पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र दि.१५.०२.२०१८
३. सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे अ.शा. पत्र क्र. II -१८०१५/०९/२०१७-एलडब्ल्युई--IV, दि.२२.०३.२०१८

प्रस्तावना:-

केंद्र शासनाने उपरोक्त अ.क्र. १ येथील पत्रांन्वये यापूर्वी नक्षल प्रभावित भागात केंद्र / राज्य शासनामार्फत विकसित करण्यात येणा-या १४ प्रकारच्या विविध सार्वजनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी वन (संवर्धन) अधिनियम,१९८० अंतर्गत ५ हेक्टरच्या मर्यादेत वनजमीन वळतीकरणाचे अधिकार राज्य शासनास प्रदान केले आहेत. केंद्र शासनाने आता उपरोक्त पत्र क्र. २ अन्वये सदर मर्यादा ४० हे. पर्यंत वाढविली असून अशा प्रकारच्या प्रस्तावांवर निर्णय घेण्याकरीता यापुढे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन करण्यास कळविले आहे. सबब, अशी समिती स्थापन करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

केंद्रीय गृह मंत्रालयाने निश्चित केलेल्या नक्षल प्रभावित भागातील वनजमीन वळतीकरणाच्या प्रस्तावांवर निर्णय घेण्याकरीता राज्य शासन याद्वारे समिती स्थापन करीत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (वने), महाराष्ट्र शासन	**अध्यक्ष**
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर	**सदस्य**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर	**सदस्य**
प्रादेशिक सशक्तता समिती,नागपूर मधील महाराष्ट्र राज्याचे तज्ञ सदस्य	**सदस्य**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर	**सदस्य**

२. **केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाने वेळोवेळी निश्चित केलेल्या** व **केंद्र / राज्य शासनामार्फत विकसित करण्यात येणा-या** विविध **सार्वजनिक पायाभूत सुविधा** निर्माण करण्यासाठी नक्षल प्रभावित भागातील वनजमीन वळतीकरणाचे प्रस्ताव **(प्रस्तावित वनक्षेत्र- ५ हे. पेक्षा अधिक परंतु ४० हेक्टरच्या मर्यादेत आणि / किंवा झाडांची संख्या प्रतिहेक्टरी ५० पेक्षा जास्त)** उक्त समितीसमोर सादर करण्यात येतील. सदर समिती वन (संवर्धन) अधिनियम,१९८० मधील तरतूदी, केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाने त्याअंतर्गत वेळोवेळी केलेले नियम, सुधारणा व मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन प्रस्तावाच्या अनुषंगाने निर्णय घेईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५१५१७००४४९९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.05.15 17:04:31 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत :-

१. सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार.
२. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
३. सचिव (वने), मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, प्रादेशिक कार्यालय, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. प्रादेशिक सशक्तता समिती, नागपूर मधील महाराष्ट्र राज्याचे तज्ञ सदस्य,
८. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सहसचिव.
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सहसचिव.
१०.मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
११. निवडनस्ती (फ- १०).

Constitution of Committee for approval of Forest Land diversion proposals in Left Wing Extremism Affected Areas.

Government of Maharashtra
Revenue and Forest Department
Government Resolution No.: FLD-2018/C.R.143/F-10
Mantralaya, Mumbai-400 032
Date: 15.05.2018

Read:-

1. Ministry of Environment and Forests, Government of India, Letter F. No. 11-9/ 98-FC, dt.13.05.2011, dt.16.06.2011, dt.10.12.2012, dt.01.02.2013, dt.17.05.2013, dt.5.3.2014
2. Ministry of Environment, Forests and Climate Change, Government of India Letter dt.15.02.2018
3. Secretary, Ministry of Home Affairs, Government of India, Letter No. D.O. No. II-18015/09/2017-LWE-IV, dt.22.03.2018

Preamble:-

Ministry of Environment, Forests and Climate Change, Government of India has earlier delegated the powers to State Governments vide letters under reference No.1 for general approval under section-2 (ii) of the Forest (Conservation) Act, 1980 for creation of 14 critical public utility infrastructure facilities in Left Wing Extremism (LWE) Affected Areas by Government Departments involving Forest Land not more than 5 ha.

Now, MoEF&CC, GoI has extended this limit up to 40 ha. vide letter under reference No.2, However, such proposals are to be placed before Committee under chairmanship of Additional Chief Secretary / Principal Secretary / Secretary of State Forests Department. Hence Constitution of such Committee was under consideration of Government of Maharashtra.

Resolution:-

Government Maharashtra hereby constitutes a Committee for consideration of proposals for diversion of Forest Land for creation of critical public utility infrastructure facilities in Left Wing Extremism Affected Districts / Areas identified by Ministry of Home affairs from time to time. The said committee will be as under:-

Additional Chief Secretary/ Principal Secretary/ Secretary (Forests), Government of Maharashtra	**Chairman**
Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur	**Member**
Additional Principal Chief Conservator of Forests, MoEF&CC, Regional Office, Government of India, Nagpur.	**Member**
One Expert Member from Maharashtra of the Regional Empowered Committee, Nagpur	**Member**
Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.	**Member**

2. Proposals for diversion of Forest Land in Left Wing Extremism Affected Areas; **(proposed forest area- more than 5 ha. & up to 40 ha. AND / OR having trees more than 50/ha)** for the purpose of **critical public utility infrastructure facilities** declared by MoEF&CC from time to time and which being developed by **Union / State Government,** shall be placed before aforesaid Committee. The Committee will examine and decide the proposal as per the provisions of Forest Conservation Act and FCA Rules made thereof with amendments and guidelines issued by the MoEF&CC, GoI from time to time.

This Government Resolution is available at the website www.maharashtra.gov.in with Reference no. 201805151700449919. This Resolution has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd794 64daaba7dc840ec375cd62a646a6498 6631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.05.15 17:05:40 +05'30'

(Virendra Tiwari)
Chief Conservator of Forests (Mantralaya)

Copy to:-

1. Secretary, Ministry of Home Affairs, Government of India, New Delhi.
2. Secretary, Ministry of Environment, Forest & Climate Change, Government of India, New Delhi.
3. Secretary (Forests), Government of Maharashtra, Mantralaya, Mumbai.
4. Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur.
5. Additional Principal Chief Conservator of Forests, MoEF&CC, Regional Office, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
7. Expert member of the Regional Empowered Committee, Nagpur.
8. Joint Secretary to the Hon'ble Chief Minister of Maharashtra.
9. Joint Secretary to the Chief Secretary of Maharashtra.
10. Private Secretary to the Hon'ble Minister (Forests), Mantralaya, Mumbai.
11. Select file F-10.